# प्रेसनोट

नाशिक,
दि. ९/०८/२०२५

## आलोसे क्र.१.योगेश नारायण घारे, उप अभियंता, जिल्हा परिषद ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, दिंडोरी जि. नाशिक आलोसे क्र.२. मनिष कमलाकर जाधव, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, दिंडोरी जि. नाशिक यांनी २१६०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | दिंडोरी पो.स्टे.नाशिक ग्रामिण गुरनं ३१८/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७, १२ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) योगेश नारायण घारे वय ४४ वर्षे, उप अभियंता, जिल्हा परिषद ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, दिंडोरी जि. नाशिक<br>२) मनिष कमलाकर जाधव वय २९ वर्षे, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, दिंडोरी जि. नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २१६०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २१६०००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे सरकारी बांधकाम कंत्राटदार आहेत. तक्रारदार यांनी जिल्हा परिषद, नाशिक कार्यालया मार्फत घेतलेल्या कामाचे निविदा जल जीवन मिशन सन २०२१-२२ अंतर्गत शिवारपाडा ता.दिंडोरी येथे नळ पाणी पुरवठा योजनेच्या केलेल्या कामाचे बाकी असलेल्या २९,२९,५२६/- रुपये रक्कमेचे बिल मंजुर करून देणेकरीता व यापुर्वी शिवारपाडा येथे केलेल्या कामाचे मंजुर केलेल्या बिलाचे तसेच जल जीवन मिशन सन २०२१-२२ अंतर्गत सावरपाडा ता. दिंडोरी येथे नळ पाणी पुरवठा योजना अंतर्गत केलेल्या कामाचे बिल मंजुर केल्याचे मोबादल्यात बक्षीस म्हणुन आलोसे क्र १ योगेश नारायण घारे उप अभियंता, जिल्हा परिषद ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, दिंडोरी जि. नाशिक यांनी तक्रादार यांचे कडे २,१६,०००/- रु लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र १ योगेश नारायण घारे उप अभियंता, जिल्हा परिषद ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, दिंडोरी जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे २१६०००/- रु लाचेची मागणी करून दि.०८.०८.२०२५ रोजी सदर लाचेची रक्कम स्विकारली व आलोसे क्र १ घारे यांचे लाच मागणीस व स्विकारण्यास आलासे क्र २ मनिष कमलाकर जाधव, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, दिंडोरी जि. नाशिक यांनी प्रोत्साहन दिल्याने त्यांचेविरूध्द दि.०९.०८.२०२५ रोजी दिंडोरी पो.स्टे.नाशिक ग्रामिण गुरनं ३१८/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक्र | :- | ९९३०९९७७०० |

स्व.प.राजपुत
( स्वप्निल राजपुत )
पोलीस निरीक्षक, ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक